## रिटेल फायनान्स :-

## ३) घर बांधणी, घर फ्लॅट / रो हाऊस  खरेदी

### (२) व्यापारी/उद्योजक यांचेसाठी -

**कर्ज मर्यादा -** एस्टीमेटच्या ८०% परंतू परतफेड विचारांत घेऊन जास्तीत जास्त रु.२५.०० लाख.
**मुदत** - १५ वर्षे (मासिक-हप्त्याने)
**व्याजदर** - १२.५०% (ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

**कर्जदार पात्रता -**

१) अर्जदार हा सांगली जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक.
२) अर्जदार व जामिनदार बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक
३) अर्जदार व्यावसाईकांना मागील तीन वर्षाच्या आयकर विवरण पत्रकातील उत्पन्नाचे सरासरीच्या ५ पटीचे ७५% इतपत कर्ज मर्यादा परंतू जास्तीत जास्त रु.२५.०० लाख पर्यंत.
४) दोन जामिनदार त्यापैकी एक नोकरदार (शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यामधील) व दुसरा व्यावसाईक की जो आयकर विवरण पत्रधारक असावा.
५) अर्जदाराचे बँकेमध्ये किमान ६ महिन्यापेक्षा जादा कालावधीचे बचत ठेव (सेव्हिंग्ज) खाते असले पाहिजे.
६) अर्जदार हा विकास सोसायटीचा थकबाकीदार नसावा.

**तारण -**

१) कर्जातून घेतलेला फ्लॅट/घर/बंगला/रो-हाऊस/दुकान गाळा खरेदीवेळी तसेच घर बांधकाम करणार असलेल्या जागेसह त्यावर तयार होणा-या घरावर कर्ज मंजूरीनतर मॉर्गेज डीडने बोजा नोंद करुन देणे आवश्यक राहील.
2) कर्ज मंजूर मर्यादेमधून ५% रक्कम ठेवीमध्ये गुंतवणूक करणेची असून सदरची ठेव कर्जास सहतारण राहील.